


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784





वर्ष ३ रे अंक : १५६ वा गुरूवार दि. ३१ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# दैनिक जनसंचलनच्या वास्तविक बातमीचे कौतूक !

## बुलढाणा ते चिखली रस्त्याच्या चौपदरीकरणाचा विषय मार्गी लागणार!







**जनसंचलन/बुलढाणा**


मलकापूर चिखली मार्गाचे होणार चौपदरीकरण! अशी बातमी ८ मे रोजी सर्वप्रथम दैनिक जनसंचलनने प्रसारित केली होती.वृत्तात चिखली रोडवरील महागड्या जमिनी रस्ते रुंदीकरणात जाण्याची भीती व्यक्त करण्यात आल्यानंतर काही लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन, याबाबत आवाज बुलंद केल्याचे समजत आहे. त्यामुळे दैनिक जनसंचलन च्या वृत्ताच्या इम्पॅक्टचे सर्वत्र स्वागत होत आहे. चिखली रोडवरील रस्ते रुंदीकरणात १५ ते २० हजार रूपये स्केअर फुट भावाच्या जमिनी रस्त्याखाली जाणार असल्याचे दैनिक जनसंचलन ने ८ मे रोजी प्रसारीत करून संकेत दिले होते.दरम्यान आता यासंदर्भात आमदार श्वेताताई महाले यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्यासोबत चर्चा करून आवाज उठवला आहे. मलकापूर ते चिखली मार्गाचे चौपदरीकरण होणार असून याची वरिष्ठ स्तरावर प्रक्रिया सुरू होती. ही प्रक्रिया सुरू असली तरी,सदर मलकापूर ते चिखली हा मार्ग सध्या बीओटी तत्त्वावर बुलढाणा अर्बन बँकेच्या अधिपत्याखाली आहे.बुलडाणा शहरातील वाढलेली लोकसंख्या व वाहतूक मलकापूर रोडवरील एआरडी सिनेमा हॉल पासून तर चिखली रोडवरील सहकार विद्या मंदिर पर्यंत कमालीची रहदारी व वाहनांची वर्दळ असते. चिखली मार्गावर तर अनेकांनी १५ ते २० हजार रुपये स्केअर फुट प्रमाणे जमिनी घेऊन ठेवल्या, बंगले बांधले.परंतु हा मार्ग नॅशनल हायवे म्हणून नवी ओळख निर्माण करेल. यासंदर्भात रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी १२०० कोटी रुपयांची घोषणा देखील केली आहे. शिवाय नॅशनल हायवे साठी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव,आमदार संजय गायकवाड, आमदार सुख चैन संचेती, आमदार श्वेताताई महाले यांचा विशेष आग्रह आहे. विशेष म्हणजे हा मार्ग बुलढाणा अर्बनच्या बीओटी तत्वातून काढावा लागणार आहे आणि बुलढाणा अर्बनला देय रक्कम राज्य शासनाला द्यावी लागणार आहे. त्यानंतर नॅशनल हायवे महामार्ग होऊ शकते. ही प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात येत असतांना आता, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी संबंधित टोल कंपनीला एकरकमी पैसे देऊन हा महामार्ग पुन्हा राष्ट्रीयमहामार्गाच्या अधिकृतांना वर्ग करण्यात येईल असा, दावा केला आहे.या बाबत संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले आहे.त्यामुळे चिखली बुलढाणा मार्गाचे चौपदरीकरण होण्याचा संकेत मिळत असून, हे काम केव्हा पूर्णत्वास जाते? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. **विशेष या बुलढाणा चिखली चौपदरीकरण रस्त्याविषयी संबधीत कार्यालय व वरिष्ट अधिकाऱ्यांशी पुर्ण अधिकृत माहिती घेउन आमच्या टिमने दि ७ मे २०२५ रोजी हॅलो बुलडाणा,सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन यावर बातमी प्रकाशीत केली होती**

## अवयवदान चळवळ म्हणून राबवा - आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

# दि. ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राज्यात अवयवदान पंधरवडा...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील अवयवदानाचे प्रमाण वाढवून अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी राज्यभरात दि. ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान ङ्गङ्घअवयवदान पंधरवडाङ्घङ्घ उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी व्यापक जनजागृती आणि समाजाभिमुख मोहिम राबवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय नियोजन बैठकीत दिले. या बैठकीत आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर, आरोग्य सेवा आयुक्त व राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संचालिका डॉ. कादंबरी बलकवडे, केईएम रुग्णालयाचे डॉ. आकाश शुक्ला, वैद्यकीय शिक्षण विभागाचे अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, अवयवदान ही एक वैयक्तिक कृती नसून, ती सामाजिक बांधिलकी आहे. ही चळवळ जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणारी आणि भीती दूर करणारी असली पाहिजे. लोकांमध्ये सकारात्मक मतपरिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि आरोग्य संस्थांमध्ये या मोहिमेचे आयोजन करण्यात येणार आहे. १५ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरावर अवयवदात्यांचा गौरव करून मोहिमेला प्रेरणादायी स्वरूप द्यावे, असेही त्यांनी सांगितले. अवयवदानाच्या प्रक्रियेबाबत जनतेमध्ये असलेले गैरसमज, भीती व अंधश्रद्धा दूर करून, याबाबतचे वैज्ञानिक आणि वैद्यकीय आधार स्पष्ट करण्यावर भर देण्यात येईल. यामध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग घेण्यात येणार आहे. अवयवदानास प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांना, विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्या (/) यांना या कालावधीत विशेष मार्गदर्शन दिले जाईल. प्रत्येक आरोग्य यंत्रणेकडून मोहिमेचा नियमित आढावा घेण्यात येणार असून राज्याला अवयवदानात आघाडीवर नेणे हे अंतिम उद्दिष्ट असल्याचे श्री. आबिटकर यांनी स्पष्ट केले. या पंधरवड्यात विविध माध्यमांतून प्रचार व प्रसार, जनजागृती रॅली, चर्चासत्रे, हेल्थ टॉक्स,




अवयवदात्यांचे अनुभव कथन यांचे आयोजन करण्यात येणार असून राज्य शासनाने हे पाऊल जनतेच्या सक्रिय सहभागाने यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्तकेलाआहे.

# आम्हा घरी धन डेटाचीच रत्ने


## संपादकीय लेख

सायबर सुरक्षा हा राष्ट्रीय सुरक्षेचाच एकात्मिक भाग असेल अशा डिजिटल भारताचे स्वप्न मी पाहतो - पंतप्रधान नरेंद्र मोदी एकविसाव्या शतकात डेटा हा केवळ संपत्ती नव्हे, तर डिजिटल संक्रमणाचा प्राणवायू झाला आहे. विसाव्या शतकात खनिज तेलाला जे महत्त्व प्राप्त झाले, तसेच वलय या शतकात डेटाभोवती निर्माण होत आहे. परंतु आयुष्याला गती आणि प्रकाश देणाऱ्या तेलाशी एका बाबतीत मात्र हा डेटा फारकत घेतो. तेलसाठे मर्यादित आहेत, तर डेटा मात्र अद्याप तरी अशा कोणत्या बंधन किंवा मर्यादांत अडकण्याची चिन्हे नाहीत. त्याचा आकार, व्याप्ती आणि गती दिवसेंदिवस वाढतच आहे. डिजिटल संक्रमणामुळे मानवी आहार-विहार आणि वर्तन-व्यवहारांच्या बहुतेक कक्षांमध्ये डेटाने प्रवेश केला आहे. ज्याच्या निर्मितीला आपण बहुतेक जण २४ तास कारणीभूत ठरतो, ज्याचे पुरवठादार आणि ग्राहकही आपणच होत आहोत, ती ही दोन अक्षरी जादू आहे तरी काय आणि तिचे महत्त्व, परिणाम-दुष्परिणाम व सुरक्षितता का आणि कशी महत्त्वाची आहे, हे समजून घ्यायला हवे. त्या संदर्भाने काही आकडेवारीवर नजर टाकू. २००३पर्यंत जगात दोन एक्झाबाइट (एक एक्झाबाइट म्हणजे एक अब्ज गिगाबाइट -जीबी) एवढ्या डेटाची उलाढाल झाली होती, जी सध्या दिवसागणिक होत आहे! २०२४मध्ये जगाने १४९ झेटाबाइट्स (एक झेटाबाइट म्हणजे एक हजार एक्झाबाइट) एवढ्या डेटाची उलाढाल केली. जगात आजवर निर्मिती झालेल्या डेटापैकी ९० टक्के हा फक्त २०२३ आणि २०२४ या दोन वर्षांतील आहे आणि दर चार वर्षांनी त्यात दुपटीने भर पडत जाणार आहे! डेटाचा वापर व व्याप्ती वाढेल तसे त्याच्या जोखमींचे धोकेही वाढत आहेत. त्यामुळे डिजिटल संक्रमण जबाबदारीने पार पाडण्यासाठी या परिसंस्थेतील सर्व घटकांना काही पावले उचलावी लागत आहेत. ई-मेल किंवा मेसेजमधून दिशाभूल करून गोपनीय माहिती मिळवणे (फिशिंग), सायबरचाचेगिरी करून संगणक यंत्रणा ठप्प करून त्या चालू करण्याच्या बदल्यात खंडणी उकळणे (रॅनसमवेअर), बनावट संगणक प्रणाली वापरण्याला उद्युक्त करून मागील दाराने संगणक यंत्रणात घुसखोरी करणे अशा अनेक मार्गांनी हे हल्ले होतात. यामध्ये तो माहितीसाठा हाताळण्याचे अधिकार असणाऱ्या व्यक्तीच सहभागी होतात. यामध्ये बेजबाबदार किंवा अजाणत्या व्यक्तींकडून उद्भवणाऱ्या धोक्यांचाही समावेश होतो. डिजिटल स्वरूपात साठवलेली गोपनीय माहिती अपेक्षित नसलेल्या व्यक्तींच्या हाती लागण्यातून इभ्रतीला धोका पोचणे, आर्थिक नुकसान, कायदेशीर अडचणी, कामकाजात व्यत्यय असे धोके संभवतात. माहिती ज्या स्वरूपात जमा केली त्याच स्वरूपात ती साठवून ठेवली तर तिचा उलगडा सहजपणे होतो. त्याऐवजी सांकेतिक लिपीचा मुखवटा तीवर चढवल्यास दुरुपयोगाची शक्यता कमी होते. वेगवेगळ्या स्रोतांकडून संकलित केलेली आणि वेगवेगळ्या गरजांसाठी आणि वेगवेगळ्या रूपांत साठवलेली माहिती एकसारख्या सुरक्षा उपायांच्या कवचाखाली ठेवणे गुंतागुंतीचे ठरते. माहितीसुरक्षेला असणाऱ्या धोक्यांपासून रक्षण करण्यासाठी सायबर सुरक्षेमधील निष्णात मनुष्यबळाची गरज भासते. त्याची त्रुटी विशेषत्वाने जाणवते. भविष्यात एआय, क्वांटम गणना, ६-जी अशा भविष्यवेधी तंत्रप्रगतीमुळे डेटा प्रक्रियेची गरज व गती प्रचंड वाढणार आहे. इंटरनेट ऑफ थिंग्जपलीकडे जाऊन आता इंटरनेट ऑफ बिहेविअर्स ही संकल्पना साकारली जात आहे. त्यामध्ये मानवी व्यवहारांचा अंदाज बांधणे आणि प्रसंगी त्यांना विशिष्ट वर्तनासाठी उद्युक्त करणे या दिशेने तंत्रविकासाचा विचार होत आहे. स्वाभाविकच त्यासाठी प्रत्येकाच्या वापरातील तंत्रसाधनांचे माहितीसंकलन व त्यांचा मेळ घालण्याला महत्त्व येणार आहे. माहितीसंकलन, तिचे पृथ:करण आणि त्यातून आर्थिक कमाई या स्वरूपातील व्यवसायाची वेगवेगळी प्रारूपे प्रस्थापित करून गुगल, ॲमेझॉन, फेसबुक, ॲपल, मायक्रोसॉफ्ट अशा तंत्र कंपन्यांनी अनेक देशांच्याही अर्थव्यवस्थांना मागे टाकण्याएवढे महाकाय रूप धारण केले आहे. माहितीसाठा हेच त्यांच्या महासत्ता होण्याच्या वाटेवर पेरलेले बीज ठरले, हे स्वाभाविक आहे. त्यामुळे, डिजिटल भविष्य साकारण्यात कोणते देश यशस्वी ठरतात, याएवढेच कोणत्या कंपन्या त्याचे सर्वाधिक लाभ उठवतात, ही बाबही महत्त्वाची ठरणार आहे. भारतासाठी हे डिजिटल परिवर्तन जेवढे आव्हानात्मक तेवढेच संधींची दारेही खुली करणारे ठरणार आहे. या परिवर्तनाच्या दृष्टीने आपण जगात आघाडी घेणारी काही पावलेही उचलली आहेत. आधार ओळखपत्रे किंवा युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) व्यवस्था ही त्याचीच उदाहरणे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या व सर्वांत मोठी बाजारपेठ असणारा देश म्हणून आपण जगातील २० टक्के डेटाची उलाढाल करतो. परंतु फक्त तीन टक्के डेटा आपल्या देशातच साठवण्याची व्यवस्था करतो. ही साठवणूक क्षमता येत्या पाच वर्षांत चार पटींनी वाढवण्याचे नियोजन आहे, मात्र त्यासोबतच, माहितीसाठा गोपनीयतेसंबंधीच्या गरज व अधिकारांची पुरेशी जाणीव नसणे, छोट्या व मध्यम उद्योग-व्यवसाय संस्थांकडे डेटा सुरक्षिततेसाठीची ठोस व्यवस्था नसणे, डेटा साठवणे व त्याचे व्यवस्थापन यांसाठी परदेशी तंत्रसंस्थांवरील अतिअवलंबित्व अशा काही त्रुटीही दूर होणे गरजेचे आहे.

# या गावात राहतो केवळ एकच माणूस!

**जनसंचलन/ जयपूर**


एखाद्या लहान गावाची लोकसंख्या किती असू शकते? १००, ५० किंवा कमीत कमी २५ लोकं तरी. पण तुम्ही असं कोणतं एखादे गावं ऐकलं किंवा पाहिलं आहे का, जिथे फक्त एक, हो, एकच व्यक्ती राहते? हे ऐकल्यानंतर किंवा वाचल्यानंतर तुम्हाला कदाचित पटणार नाही, पण राजस्थानच्या चुरू जिल्ह्यात एक गाव आहे जिथली लोकसंख्या फक्त १ आहे. हो, हे अगदी खरं आहे. सरकार दरबारी नोंद असलेल्या या गावाचे नाव श्याम पांडिया आहे. हे गाव नेठवा ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येते. आश्चर्याची बाब म्हणजे २०११ मध्ये या रहस्यमय गावात जनगणना देखील करण्यात आली. जनगणनेनुसार, या गावाची लोकसंख्या फक्त एक (व्यक्ती) दाखवण्यात आली आहे. या व्यक्तीचे नाव ज्ञानदास आहे. विशेष म्हणजे या गावात एकही घर नाही. तर श्याम पांडिया धाम नावाचे एकच मंदिर आहे. या गावाचे नाव सरकारी नोंदींमध्ये या मंदिराच्या नावाने नोंदवले गेले आहे. हे मंदिर ५२१ बिघा सरकारी जमिनीच्या मध्यभागी ३०० फूट उंच टेकडीवर बांधले गेले आहे. मंदिराचे पुजारी ज्ञानदास हे नियमितपणे सकाळ-संध्याकाळ मंदिरात येऊन पूजा करतात. असं म्हटले जाते की, हे मंदिर शेकडो वर्षे जुने आहे. लोकांची इथे श्रद्धा आहे. दरवर्षी भाद्रपद महिन्याच्या अमावस्येला येथे एक मोठा मेळा भरतो, ज्यामध्ये शेकडो भाविक सहभागी होतात आणि मंदिरात प्रार्थना करतात. पुजारी ज्ञानदास यांच्या आधी राकेश गिरी नावाचा एक व्यक्ती या मंदिरात पूजा करत असे. राकेश गिरी यांच्या मृत्युनंतर ज्ञानदास यांनी पूजाची जबाबदारी घेतली. पूर्वी राकेश गिरी हे या गावाचे एकमेव रहिवासी होते आणि आता ज्ञानदास हेदेखील या गावचे एकमेव



रहिवासी आहेत. विशेष म्हणजे हे विचित्र गाव पाहण्यासाठी दरवर्षी शेकडो पर्यटक येतात. या गावाबद्दल ज्याला ऐकायला मिळतं, ती व्यक्ती हे गाव पाहण्यासाठी नक्कीच येतो. लोकांना हे आश्चर्यकारक वाटते की, आपल्या देशात, एका राज्यात असंही एक गाव आहे ज्याची लोकसंख्या फक्त १ आहे. एकूण ५२१ बिघा जमीन असलेल्या या गावात मंदिराशिवाय इतर कोणतेही निवासी ठिकाण नाही. फक्त दीड बिघा जमीन घरांसाठी राखीव आहे. उर्वरीत जमीन जनावरे चारण्यासाठी वापरली जात

# जागतिक काविळ दिनानिमित्त जनजागृती रॅली

**जनसंचलन/बुलढाणा**




जागतिक काविळ दिनानिमित्त आरोग्य विभाग, बुलढाणा यांच्या वतीने आज शहरात जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली उत्साहात पार पडली. रॅलीच्या वेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. घोंगटे, बाह्य रुग्ण विभाग प्रमुख, काविळ नियंत्रण कार्यक्रम प्रमुख, रक्त संक्रमण अधिकारी, आर.बी.एस.के. समन्वयक, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा, आयसीयू, एन.व्ही.एच.सी.पी., तसेच जिल्हा एड्स नियंत्रण विभाग व परिचर्या केंद्राचे सर्व अधिकारी/ कर्मचारी यांची उपस्थिती होती. या रॅलीत जिल्हा रुग्णालयातील नर्सिंग केंद्राचे अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. नर्सिंग प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य खेडेकर यांनी रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ज्यांना भारताची बाजू दिसत नाही त्यांना आरसा दाखवण्यासाठी उभा, नरेंद्र मोदी यांचं विरोधकांना लोकसभेत प्रत्युत्तर

**नवी दिल्ली :** लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी ऑपरेशन सिंदूरवरुन सरकावर अनेक प्रश्न उपस्थित करत मोदी सरकारवर निशाणा साधला. विरोधकांच्या टीकेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत भाषणासाठी उभे राहिले. त्यांनी विरोधकांच्या टीकेला उत्तर दिलं. त्यांनी ऑपरेशन सिंदूरची सविस्तर माहिती दिली. ङ्गमी १४० कोटी नागरिकांच्या भावनेत आपलं स्वर्ग मिळवण्यासाठी उपस्थित आहे. १४० कोटी देशवासीयांच्या आवाज या सभागृहात गुंजत आहे. त्यात सूर मिळवण्यासाठी मी इथे उभा आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान ज्याप्रकारे देशातील नागरिकांनी मला साथ दिली, मला आशीर्वाद दिले, देशाच्या जनतेचे माझ्यावर कर्ज आहेत. मी देशाच्या जनतेचं आभार व्यक्त करतो. मी देशातील



नागरिकांचं अभिनंदन करतोङ्कङ्क, असं मोदी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला म्हणाले.ङ्गङ्गमी सांगितलं होतं की, संसदेचं हे सत्र भारताच्या विजयोत्सवचं सत्र आहे. संसदेचं हे सत्र भारताच्या गौरवाचं सत्र आहे. मी विजयोत्सवची बात करतोय, तर हा विजयोत्सव दहशतवाद्यांच्या हेडक्वार्टरला माती मिळवण्याचा आहे. हा विजयोत्सव सिंदूराची शपथ पूर्ण करण्याचा आहे. हा भारतीय सैन्याच्या शौर्य आणि सामर्थ्याचा विजयोत्सव आहे. १४० कोटी देशवासीयांची एकता, इच्छाशक्ती, त्यांच्या एक अप्रतिम विजयाचा विजयोत्सवाची मी बात करत आहे. मी याच विजयी भावाने या सभागृहात भारताची बाजू मांडायला उभा राहिलो आहे. ज्यांना भारताची बाजू दिसत नाही त्यांना मी आरसा दाखवण्यासाठी उभा राहिलो आहेङ्कङ्क, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी विरोधकांना प्रत्युत्तर दिलं.२२ एप्रिलला पहलगाममध्ये ज्याप्रकारे क्रूर घटना घडली, ज्याप्रकारे दहशतवाद्यांनी निर्दोष नागरिकांना त्यांचा धर्म विचारुन गोळ्या झाडल्या ही क्रूरताची पराकाष्ठा होती. भारताला हिंसेच्या आगीत झोकण्यासाठी हा सुविचारीत प्रयत्न होता.

भारतात दंगल पसरवण्याचा हा कट होता. मी देशवासीयांचे आभार मानतो की, देशाने एकताने त्या कटाला उद्ध्वस्त केलंङ्कङ्क, असं मोदी म्हणाले.२२ एप्रिल नंतर मी सार्वजनिकपणे जगाला समजावं म्हणून इंग्रजीत देखील काही भाष्य केलं होतं. मी सांगितलं होतं की, आम्ही दहशतवाद्याला मातीत गाडू आणि दहशतवाद्यांच्या आकांना शिक्षा होईल आणि कल्पनेहूनही शिक्षा होईल. मी २२ एप्रिलला विदेशात होतो. मी तातडीने भारतात आलो. देशात आल्यानंतर मी बैठक बोलावली. त्या बैठकीत आम्ही स्पष्ट निर्देश दिले की, दहशतवादाला करारा जबाब द्यायला हवा आणि हा आमचा राष्ट्रीय संकल्प आहेङ्कङ्क, असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितलंआम्हाला आपल्या सैन्यदलाच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास आहे. सैन्याला कारवाईची सूट देण्यात आली होती. हे सुद्धा सांगितलं गेलं होतं की, केव्हा, कधी आणि कशाप्रकारे प्रत्युत्तर द्यायची हे सर्व त्या बैठकीत निश्चित झालं होतं. याबाबत मीडियातही त्यावेळी रिपोर्ट आले होते. आम्हाला गर्व आहे की, दहशतवाद्यांना ती शिक्षा दिली, शिक्षा अशी आहे की, दहशतवाद्यांच्या आकांची झोप उडाली आहेङ्कङ्क, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## चालकाच्या ओव्हरटेकिंगनं प्रवाशांच्या जीवाशी खेळ, मुंबई गोवा महामार्गावर भीषण अपघात, ७ जण जखमी

**माणगाव :** रायगड जिल्ह्यातील मुंबई गोवा महामार्गावर गेल्या सहा महिन्यात जवळपास ऐंशी हून अधिक अपघात झाले असून पस्तीस निष्पाप नागरिकांचा जीव गेला आहे. रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील रातवड येथे श्रीवर्धन येथून मुंबई बाजूकडे जाणाऱ्या बसवरील नियंत्रण सुटल्याने अपघात होऊन बस पलटी झाल्याने यामध्ये चालक सहित सात जण जखमी झाले असल्याची घटना घडली.याबाबत सविस्तर माहिती अशी की, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात कार्यरत असणारे चालक सिध्देश्वर विश्वनाथ भैरट हा त्याच्या ताब्यातील बस क्रमांक एम.एच २० बी.एल ३६२० ही घेऊन रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथून मुंबईच्या दिशेने जात होती. सदर बस वरील चालक सिध्देश्वर विश्वनाथ भैरट हा बस घेऊन आज दिनांक २९ जुलै २०२५ सायंकाळी चार वाजून चाळीस मिनिटाच्या सुमारास मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव तालुक्यातील रातवड गावच्या हदीत आला . त्यावेळी समोरून जाणा-या ट्रकला भरधाव वेगात रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने बेदरकारपणे डाव्याबाजूने ओव्हरटेक करीत असताना बस चालक सिद्धेश्वर यांचे बसवरील नियंत्रण सुटल्याने ताब्यात असणारी बस ही कच्या रस्त्यावर जाऊन डाव्या बाजूला पलटी झाली.या अपघातात माया सुनिल जाधव (वय ५५, रा. डोंबिवली, मूळ रा. कालिंदे-तळा),रोहित कुमार रामनाथ पांडे ((वय ३०, सध्या रा. कृष्णानगर-रोहा, मुळ रा. बिहार),बस चालक सिध्देश्वर विश्वनाथ



भैरट(वय ४१वर्षे, राहणार - येवता,तालुका - केज जिल्हा - बीड , सध्या राहणार - वडघर भिवंडी, ठाणे),मयुरेश महेश जाधव (वय ३, रा. गारभट आदिवासी वाडी, ता. रोहा),निकिता जितेंद्र पवार (वय ३० वर्ष, रा. वडाला, मुंबई, मुळ चोचीदे-महाड),जितेंद्र, संजय पवार (वय ३५, रा. वडाला, मुंबई, मुळ चोचीदे-महाड), जिनल जितेंद्र पवार, (वय ९, रा. वडाला, मुंबई, मुळ चोचीदे-महाड) जखमी झाले.या अपघाताची माहीत मिळताच माणगांव पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक निवृत्ती बोराडे,पोलिस उप निरीक्षक नरेंद्र बेलदार तसेच पोलिस कर्मचारी यांनी तत्काळ धाव घेऊन जखमी प्रवाशाना माणगांव उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले त्याच्या वर उपचार चालू आहे. माणगाव उप विभागीय पोलिस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांनी रुग्णालयात जाऊन जखमी प्रवाशी यांची विचारपूस केली.या अपघाताची फिर्याद महेश मारुती जाधव( वय २४ वर्षे व्यवसाय-मजुरी रा. गारभाट आदीवासी वाडी पो. गारभाट ता. रोहा जि. रायगड) यांनी बस चालक सिद्धेश्वर विश्वनाथ भैरट यांच्या विरोधात दिली असून रात्री उशिरा या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नशिकांत दुबे आणि वर्षा गायकवाड यांच्यात पुन्हा जुंपली, लोकसभेत भर सभागृहात काय घडलं?



**नवी दिल्ली :** भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मराठी बाबतचे वक्तव्य केल्यावर त्यांना संसदेच्या व्हऱ्यांड्यात गाठून त्यांच्या वक्तव्याबाबत प्रश्न विचारणाऱ्या काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांच्यात आज भर लोकसभेत पुन्हा जाहीर वाद झाला. ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेत निशिकांत दुबे बोलत होते. त्यावेळी वर्षा गायकवाड या खाली बसून दुबे यांच्या भाषणात बोलत होत्या. त्यामुळे नाराज झालेल्या दुबे यांनी वरील टिप्पणी केली. घटना घडली त्याच्या दुसऱ्या दिवशीही दुबे यांनी, सारा प्रकार हसतखेळत घडला आणि आमच्यात कोणतीही कटुता नव्हती असे काही पत्रकारांना सांगितले होते. संसद भवनाच्या व्हरांड्यात घडलेल्या घटनेवर दुबे यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. आज दुबे बोलत असताना गायकवाड सतत बोलत होत्या. त्यामुळे नाराज झालेले दुबे यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. ङ्गअशा प्रकारे समोरून रनिंग कॉमेंट्री चालू राहिली तर कामकाज कसं होणार? या भगिनी (वर्षा गायकवाड) पाहा. यांना इतकेही माहिती नाही की संसदेच्या व्हरांड्यात मजामस्ती चालते. पण या त्याची बातमी करतात. अशा प्रकारे आम्हीही यांच्या भाषणात बोलू लागलो तर काँग्रेसचे खासदार संसदेत एक शब्दही बोलू शकणार नाहीतफ्फ, असा टोला निशिकांत दुबे यांनी लगावला.यावेळी पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनीही वर्षा गायकवाड यांना इशारा दिला. तुम्ही बसून टिप्पण्या करू नका. मी तुम्हाला मध्ये बोलण्याची परवानगी दिलेली नाही. तुम्ही कामकाजात अडथळा आणू नका, असं पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनी वर्षा गायकवाड यांना बजावलं.दरम्यान, मराठी भाषा आणि मराठी भाषिकांबद्दल गरळ ओकणाऱ्या निशिकांत दुबे या खासदारांना महाराष्ट्रातील तीन काँग्रेसच्या महिला खासदारांनी संसदेत घेरलं होतं. या महिला खासदारांनी निशिकांत दुबे यांना त्यांच्या वक्तव्याचा जाब विचारला होता. त्यावेळी निशिकांत दुबे यांची चांगलीच बोलती बंद झाली होती.

# बीसीसीआय ॲक्शन मोडमध्ये; कसोटीतील खराब कामगिरीनंतर मोठी कारवाई; इंग्लंडविरुद्ध मालिकेनंतर थेट कोच बदलणार....



**मुंबई:** भारतविरुद्ध इंग्लंड पाच सामन्यांची कसोटी मालिका सुरु आहे. या मालिकेतील चौथा कसोटी सामना मँचेस्टरमध्ये खेळला गेला ज्यात भारताने हा सामना खेळून ड्रॉ केला. भारतीय क्रिकेट संघाने मँचेस्टरमध्ये खेळलेला चौथा कसोटी सामना आपल्या लढाऊ भावनेने अनिर्णित ठेवला. हा अनिर्णित सामना टीम इंडियासाठी विजयापेक्षा कमी नाही. यानंतरही टीम इंडियाचा कोचिंग स्टाफ लक्ष्यावर आहे. इंग्लंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी सुरु असताना भारतीय संघाच्या ड्रेसिंग रुममधून मोठा निर्णय समोर आला आहे.भारत पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळण्यासाठी इंग्लंडला आला आहे. चार सामने खेळले गेले आहेत आणि ते १-२ ने पिछाडीवर आहे. टीम इंडिया येथून मालिका जिंकू शकत नाही. जरी टीम इंडिया द ओव्हल येथे खेळला जाणारा शेवटचा सामना जिंकला तरी मालिका अनिर्णित राहील. बीसीसीआय टीम इंडियाच्या कोचिंग स्टाफमध्ये बदल करण्याचा विचार करत आहे. टीम इंडिया पाचवा कसोटी सामना जिंको किंवा मरोच्या स्थितीत आहे.भारतीय बोर्डाने बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. वृत्तानुसार, गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल आणि सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोइशेटे बोर्डाच्या लक्ष्यावर आहेत आणि या मालिकेनंतर या दोघांनाही काढून टाकले जाऊ शकते. सप्टेंबरमध्ये होणाऱ्या या दोघांनाही काढून टाकण्यासाठी बोर्ड आशिया कपपर्यंत वेळ घेईल. भारताच्या पुढील कसोटी मालिकेपूर्वी बोर्ड अनेक बदल करण्याचा प्रयत्न करीत आहे. ही मालिका फक्त भारतातच खेळवली जाईल.मॉर्केल आणि टेन डोइशेट यांची निवड टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी केली होती. दोघेही पूर्णपणे अपयशी ठरले आहेत, विशेषतः कसोटी क्रिकेटमध्ये. मोर्केलबद्दल खूप विचार केला जात होता, परंतु त्याला वगळण्याचा अंतिम निर्णय अंशुल कंबोजला प्लेइंग-११ मध्ये स्थान दिल्यानंतर घेण्यात आला, ज्याचा वेग १२० किमी प्रतितास होता.कंबोजने मँचेस्टरमध्ये पदार्पण केले होते, परंतु तो प्रभावित करू शकला नाही. याशिवाय, मॉर्कलच्या आगमनानंतर, भारताचा गोलंदाजीचा हल्ला कसोटी सामन्यांमध्ये पूर्वीइतका तीक्ष्ण दिसत नाही. याशिवाय, कुलदीप यादवला बाहेर ठेवण्याचा निर्णय हे देखील एक कारण आहे असे म्हटले जात आहे. अहवालात एका सूत्राचा हवाला देऊन म्हटले आहे की, ङ्क्षप्रशिक्षक नेहमीच संतुलनाबद्दल बोलतात, परंतु कुलदीप यादवसारख्या जागतिक दर्जाच्या गोलंदाजाला बाहेर ठेवणे ही एक मोठी चूक आहे.ङ्क मोर्केलबद्दल असे म्हटले जात आहे की, ङ्क्षतो एकाही वेगवान गोलंदाजाला सुधारू शकला नाही. बीसीसीआयचा असा विश्वास आहे की त्यांनी दोन्ही प्रशिक्षकांसोबत खूप संयम दाखवला आहे आणि आता त्यांना पावले उचलावी लागतील. बीसीसीआय इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या दोन निवडकर्त्यांवर लक्ष ठेवून आहे - अजित आगरकर आणि शिवसुंदर दास आणि बोर्ड त्यांची चौकशी केल्यानंतर निर्णय घेऊ शकते.

# पत्नीचे अनैतिक संबंध सहन होईना, पतीने आयुष्याची दोर कापली

**धाराशिव:** धाराशिव जिल्ह्यामध्ये एक हृदय तिळवटून टाकणारी घटना घडली आहे. येथे पत्नीचे अनैतिक संबंध सहन न झाल्याने पतीने आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. आपला जीव देण्यापूर्वी या पतीने फेसबुकवर व्हिडिओ पोस्ट केला त्यानंतर त्याने हे टोकाचं पाऊल उचललं. या घटनेने धाराशिवमध्ये खळबळ माजली आहे.धाराशिव तालुक्यातील आळणी येथील तानाजी नानासाहेब भराडे या शेतकऱ्याने आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. त्याला पत्नीचे अनैतिक संबंध सहन न झाल्यामुळे त्याने गळफास घेत आपल्या आयुष्याची दोर नेहमीसाठी कापलीधाराशिव शहरातील एका पुरुषाबरोबर पत्नीचे अनैतिक संबंध होते. ही गोष्ट जेव्हा पतीला समजली तेव्हा ते नैराश्यात गेले आणि त्यांनी गळफास घेऊन आपल्या आयुष्याची अखेर केली. ही घटना धाराशिव तालुक्यात घडली आहे.पत्नीच्या प्रियकराकडून वारंवार तानाजी भराडे यांना मानसिक त्रास होऊ लागला होता, त्यामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे. पत्नी अनुराधा आणि धाराशिव शहरातील बालाजी घाडगे यांच्या मानसिक त्रासाला कंटाळून मी जीव देत असल्याचं त्यांनी सांगितलं. आपला जीव देण्यापूर्वी या शेतकऱ्याने एक व्हिडिओ काढला, यामध्ये तानाजी भराडे यांनी म्हटलं.



# अक्षय कुमार प्रॉपर्टी विकून पुन्हा झाला मालामाल! किती कोटींना विकले बोरिवलीतील २ अपार्टमेंट? थेट ९१% नफा

**मुंबई:** अभिनेता अक्षय कुमार त्याच्या प्रॉपर्टीसंदर्भातील व्यवहारामुळे चर्चेत आला आहे. त्याने मुंबईतील बोरीवली याठिकाणी असलेले त्याचे दोन आलिशान निवासी अपार्टमेंट ७.१० कोटी रुपयांना विकले आहेत. या मालमत्तेतून त्याला ९१ टक्क्यांहून अधिक नफा झाला आहे.अभिनेत्याने त्याचे एक अपार्टमेंट ५.७५ कोटी रुपयांना विकले, जे त्याने २०१७ साली ०३.०२ कोटी रुपयांना खरेदी केली होते. स्केअर यार्ड्सने या व्यवहाराविषयी वृत्त दिले आहे. अक्षय कुमारची ही प्रॉपर्टी ११०१



चौरस फुटांची असून त्यात दोन कार पार्किंगची जागा आहे. या व्यवहारात ३४.५० लाख रुपयांची स्टॅम्प ड्यूटी आणि ३० हजार रुपयांचे नोंदणी शुल्कदेखील आहे. तर दुसरे अपार्टमेंट त्याने २०१७ सालीच ६७.९० लाख लाख रुपयांना खरेदी केले होते, जे आता १.३५ कोटी कोटी रुपयांना विकले गेले. या मालमत्तेचा कार्पेट एरिया २५२ चौरस फूट आहे. या दोन्ही व्यवहारातून अवघ्या ८ वर्षात त्याने ९१.९५ टक्क्यांचा नफा कमावला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय कुमारच्या दोन्ही अपार्टमेंट एकमेकांच्या जवळ आहेत. दरम्यान यापूर्वी अक्षय कुमारने मार्चमध्ये त्याच टाउनशिपमधील दोन निवासी मालमत्ता ६.६० कोटी रुपयांना विकल्या होत्या, जी प्रॉपर्टीदेखील त्याने २०१७ साली खरेदी केली होती. तर एप्रिल २०२५ मध्ये त्याने लोअर परळमधील त्याचे ऑफिस ८ कोटी रुपयांना विकले होते.अक्षय कुमारच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाल्यास तो लवकरच भूत बंगला सिनेमात झळकणार असून, यामध्ये त्याच्यासोबत अभिनेत्री वामिका गब्बी मुख्य भूमिकेत आहे. शिवाय परेश रावलही महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. याशिवाय तो सुनील शेट्टी आणि परेश रावल यांच्यासोबत हेरा फेरी ३ मध्येही दिसणार आहे. अक्षय कुमारकडे वेलकम टू द जंगल हा चित्रपट देखील आहे, जो एक मल्टीस्टारर सिनेमात असून त्यात १५ हून अधिक कलाकार झळकणार आहेत. याशिवाय त्याच्या जॉली एलएलबी ३, हैवान या सिनेमांचीही प्रतीक्षा आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रोहित पवारांची परळीत महादेव मुंडे कुटुंबियांची भेट, थेट पोलिस अधीक्षकांना फोन, म्हणाले..



**बीड:** मला राजकीय काहीच बोलायचे नाही. एस आय टी स्थापन करून काहीच होत नाही. तुमच्या सोबत सर्व जाती धर्मातील लोक आहेत असे म्हणत रोहित पवार ंनी मुंडे कुटुंबियांना आश्वस्त केले. यावेळी रोहित पवार यांनी बीड येथील पोलिस अधीक्षक यांना कॉल केला आणि ज्या प्रमाणे मागणी केली आहे त्या प्रमाणे अधिकारी नेमून खुनाचा तपास करण्यात यावा असे निवेदन यावेळी रोहित पवार यांनी कॉलवर केले. या प्रकरणात सबंध महाराष्ट्राने पाहिले आहे कश्या पद्धतीने त्यांचा खून केला गेला आहे. तुम्ही अद्याप परळी येथील लोकांना आणखी ओळखलं नाही. आता मी आमच्या बहिणीला आणि या तीन मुलांच्या आईला आम्ही काय सांगायचे असा सवाल या वेळी रोहित पवार यांनी एस पी ना केला. साबळे यांची नियुक्ती करण्यासाठी आय जी यांना बोलावे लागणार. असे एस पी यांनी रोहित पवार यांना म्हटले आहे. यावेळी रोहित पवार यांनी आय जी यांना कॉल केला. बीड जिल्ह्याच्या परळी येथील मयत व्यापारी महादेव मुंडे यांच्या कुटुंबाची भेट घेण्यासाठी आमदार रोहित पवार दाखल झाले. यावेळी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर देखील रोहित पवार यांच्या सोबत मुंडेंच्या भेटीस परळीत दाखल झाले होते. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची व मुलांची विचारपूस करताना केली. बीड जिल्ह्याच्या परळी येथील मयत व्यापारी महादेव मुंडे यांचा निर्घृण खून करण्यात आला होता या खुनाला तब्बल २१ महिने उलटून गेली अद्याप खुनातील आरोपी पोलिस अधिकाऱ्यांना निष्पन्न करता आले नाही म्हणून महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी विविध प्रकारची आंदोलने केली मात्र अद्याप म्हणावा तसा प्रतिसाद पोलिस प्रशासनाच्या वतीने दिला जात नाही याचा खेद ज्ञानेश्वरी मुंडे यांनी व्यक्त केली आहे.यावेळी झालेल्या झालेल्या घटनेचा घटना क्रम रोहित पवार यांनी ऐकला वाल्मीक कराड यांना जमीन पाहिजे म्हणून हा प्रकार झाला असे ही सांगण्यात आले.

पोलिस निरीक्षक साबळे यांना परत खुनाच्या तपासात परत बोलवा एस आय टी मध्ये साबळे सरांना घेण्यात यावे त्यांना पूर्ण अधिकार देण्यात यावे अशी मागणी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी अशी मागणी यावेळी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी रोहित पवार यांच्याकडे केली. तसेच पंकज कुमावत यांना ही केस तपासामध्ये घेण्यात यावं. तर वाल्मीक कराड याला पी सी आर मध्ये घेण्यात यावं, त्याचे मूळ त्यांचे सहकारी यांना तत्काळ अटक करा अशी मागणी ही मुंडे परिवाराच्या वतीने करण्यात आली. तर आरोपींची नार्को टेस्ट करणे आवश्यक आहे. केस मध्ये खूप महिने होऊन गेले आहेत..माझ्या मुलांनी अंत्यविधी वेळी शपथ घेतली आहे माझ्या वडिलांच्या मारेकऱ्याला मी मारणार. अशी भावना माझ्या मुलात निर्माण झाली आहे.. आता आरोपी निष्पन्न झाले आहेत त्यांना मात्र पकडले जात नाही. अद्याप माझा जवाब देखील घेतला नाही अशी खंत ज्ञानेश्वरी मुंडे यांनी म्हंटले आहे.

# आमच्यासाठी काय कमावून ठेवलं? लेकाला राग अनावर, जन्मदात्या बापाला इतकं मारलं की जीव गेला



**सांगली (तासगाव):** आमच्यासाठी काय कमावून ठेवलयस? आम्हाला कायम दारिद्र्यातच ठेवलं आहेस! या शब्दांतून पेटलेल्या वादानं तासगावात एकाने जन्मदात्याचा बळी घेतला आहे. पैशांच्या वादामुळे मुलाने केलेल्या अमानुष मारहाणीत ६५ वर्षीय वडिलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना तासगावातील कांबळेवाडी येथे घडली आहे. या प्रकरणी तासगाव पोलिसांनी मुलाला अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सुधाकर तुकाराम कांबळे (वय-६५, रा. कांबळेवाडी, तासगाव, जि. सांगली) यांना त्यांचा मुलगा सचिन सुधाकर कांबळे (वय-४५) याने लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही मारहाण इतकी गंभीर होती की त्यात सुधाकर कांबळे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी मयत सुधाकर कांबळे यांच्या पत्नी सुनिता अशोक कांबळे यांनी तासगाव पोलिसांत फिर्याद दिली आहे.मयत सुधाकर कांबळे हे पत्नी आणि मुलगा सचिन यांच्यासोबत कांबळेवाडीत राहत होते. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. या गरिबीवरून मुलगा सचिन नेहमी वडिलांशी वाद घालायचा. रविवार, २७ जुलै रोजीही सचिनने याच कारणावरून ६५ वर्षीय वडिलांना दिवसभर लाथा-बुक्क्यांनी, गाल, कान आणि शरीरावर अनेक ठिकाणी ठोसे मारत मारहाण केली.सोमवारी (२८ जुलै) सकाळी सुधाकर कांबळे यांची पत्नी त्यांना उठवण्यासाठी गेली असता, सुधाकर निपचित पडलेले दिसले. त्यांनी तातडीने शेजाऱ्या-पाजाऱ्यांना मदतीसाठी हाका मारल्या. सकाळी सुधाकर कांबळे यांचे मेहुणे कुमार मल्लाप्पा मागडे यांनी ११२ या पोलीस मदत क्रमांकावर फोन करून सुधाकर कांबळे यांचा गळा दाबून खून झाल्याची माहिती दिली.या घटनेची माहिती मिळताच, तासगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तपास सुरू केला. घटनास्थळावरील प्राथमिक माहितीनुसार, पोलिसांनी संशयित सचिन कांबळे याला ताब्यात घेतले. मृत सुधाकर कांबळे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला होता. शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालातून सचिन कांबळेने केलेल्या मारहाणीमुळे वडिलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर, तासगाव पोलिसांनी संशयित सचिन सुधाकर कांबळे यास खुनाच्या आरोपाखाली ताब्यात घेतले असून, अधिक तपास सुरू आहे.

या घटनेची माहिती मिळताच, अतिरिक्त पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, प्रभारी पोलीस उपविभागीय अधिकारी विमला एस, पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील, पोलीस उपनिरीक्षक अविनाश घोरपडे, पोलीस अंमलदार अभिजीत गायकवाड, सागर पाटील, प्रशांत चव्हाण, सतीश साठे आदींनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला

# राज्यात भाजप रुजवणाऱ्या नेत्याच्या लेकीकडे मोठी जबाबदारी? मिशन मुंबईसाठी लक्षवेधी घडामोडी

**मुंबई:** विधानसभा निवडणुकीत दमदार आणि ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भारतीय जनता पक्षानं आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कंबर कसली आहे. मुंबईत महायुतीत लढू. पण अन्य ठिकाणी स्वबळावर लढण्याची तयारी भाजपनं केल्याची माहिती आहे. कार्यकर्त्यांच्या भावना, त्यांचा आग्रह याबद्दलची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांना दिली. २०१७ मध्ये भाजपनं मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवली. त्यावेळी भाजप च्या जागा ८२ वर पोहोचल्या. त्याआधी २०१२ मध्ये भाजपनं शिवसेनेसोबत युतीत लढताना ३१ जागा जिंकल्या होत्या. २०१४ मध्ये राज्याची सत्ता मिळाल्यावर भाजपनं मुंबईत चांगलाच जम बसवला आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर आलेली असताना भाजप संघटनात्मक बदल करण्याच्या तयारीत आहे.मुंबई भाजपची धुरा सध्या आशिष शेलारांकडे आहे. शेलार मामांच्या नेतृत्वात भाजपनं २०१७ मध्ये शिवसेनेसमोर कडवं आव्हान दिलं. तेव्हा शिवसेना एकसंध होती. स्वबळावर लढताना शिवसेनेनं ८४ जागा जिंकल्या. तर भाजपनं ८२ जागांपर्यंत मजल मारली. शिवसेना आणि भाजपला जवळपास सारख्याच जागा मिळाल्या. पण राज्यात दोन्ही पक्ष सत्तेत असल्यानं भाजपनं शिवसेनेला सत्ता स्थापनेची संधी दिली.एक व्यक्ती एक पद असा भाजपचा नियम आहे. आशिष शेलार राज्याच्या मंत्रिमंडळात आहे. त्यामुळे आता मुंबई भाजच्या अध्यक्षपदी नवा चेहरा दिला जाणार आहे. वरिष्ठ नेत्या आणि माजी खासदार पूनम महाजन यांची मुंबई भाजपच्या अध्यक्षपदी वर्णी लागू शकते, असं वृत्त न्यूज१८ नं दिलं आहे. पूनम महाजन यांच्यासोबतच आमदार अमित साटम आणि प्रवीण दरेकर यांची नावंदेखील अध्यक्ष पदाच्या स्पर्धेत आहेत.राज्यात भाजप रुजवण्यात मोठा वाटा असलेल्या पूनम महाजन पक्षात २००६ पासून सक्रिय आहेत. वयाच्या २६ व्या वर्षापासून त्या पक्षात कार्यरत आहेत. भारतीय जनता युवा मोर्चाच्या सचिव पदावर त्यांनी काम केलं आहे. २००९ मध्ये त्यांनी घाटकोपरमधून विधानसभा निवडणूक लढवली. पण मनसेच्या राम कदम यांनी त्यांचा पराभव केला. यानंतरही त्या पक्ष संघटनेत काम करत राहिल्या. २०१० मध्ये त्यांनी भारतीय जनता युवा मोर्चाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली.

# वयाच्या १९ व्या वर्षी माधुरी- जुही यांच्या नाकी नऊ आणणारी नायिका, एकाच्या प्रेमात फसली, नानांसोबतही लिव्ह इन् राहून पस्तावली

**मुंबई-** १९९० च्या दशकात, बॉलिवूडवर माधुरी दीक्षित, जुही चावला, करिश्मा कपूर, ममता कुलकर्णी, मनीषा कोइराला आणि श्रीदेवी सारख्या सौंदर्यवती नायिकांचे राज्य होते. या काळात अनेक नवीन नायिका इंडस्ट्रीत आल्या, परंतु त्यापैकी फार कमी जणी त्यात टिकू शकल्या. मात्र एक अशी हिरॉइन देखील आली जिने या नावाजलेल्या हिरॉइन्सची जागा घ्यायला सुरुवात केली. चित्रपटसृष्टीत प्रवेश करताच तिने आपल्या हुशारीने, आकर्षणाने आणि पडद्यावरच्या प्रेझेन्सने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तिच्या वेगाने वाढणाऱ्या लोकप्रियतेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि तिला मोठ्या दिग्दर्शकांकडून ऑफर येऊ लागल्या. तिने प्रत्येक आघाडीच्या अभिनेत्यासोबत काम केले, परंतु तिचे स्टारडम अचानक कमी झाले. हे सर्व ब्रेकअपने अभिनेत्रीचे आयुष्य बदलले.ही अभिनेत्री कोण आहे? ते तुम्ही ओळखलं का.... ती दुसरी कोणी नसून आयशा झुल्का आहे. आज तिचा ५२ वा वाढदिवस साजरा करत आहे. तिने कुर्बान (१९९१), जो जीता वही सिकंदर (१९९२), खिलाडी (१९९२) आणि मेहरबान (१९९३) सारख्या हिट चित्रपटांमध्ये काही मोठ्या सुपरस्टार्ससोबत काम केले. याशिवाय तिने बंगाली, तेलुगू आणि कन्नड चित्रपटांमध्येही आपली छाप सोडली. तिच्या कारकिर्दीच्या शिखरावर असताना, ती अचानक इंडस्ट्री सोडून चित्रपटांमधून गायब झाली. यामागील कारण अभिनेता अरमान कोहलीसोबतचे तिचे ब्रेकअप होते. लेहरेनशी बोलताना आयशाने चित्रपटसृष्टीतील तिच्या अचानक गायब होण्यामागे काय सत्य होते ते सांगितले.जुन्या मुलाखतीत जेव्हा तिला कोहरा आणि अनम चित्रपटातील तिचा सह-अभिनेता अरमान कोहलीशी लग्न करायचे होते का असे विचारले गेले तेव्हा तिने सांगितले की, मी लग्न



करणार असल्याने मी चित्रपट साइन करणे थांबवले होते, परंतु लग्नाचा कोणताही विचार नाही आणि मी परत इथे आली आहे. आयशा आणि अरमानचे नाते ९० च्या दशकात सर्वात जास्त चर्चेत होते. अरमानने तिला फसवले, ज्यामुळे त्यांचे ब्रेकअप झाले. आयशाने अलिकडेच एका पॉडकास्टमध्ये स्पष्टपणे सांगितले की ती आता त्या व्यक्तीबद्दल बोलू इच्छित नाही. याशिवाय आयशा नाना पाटेकरांसोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहिल्याचे देखील चर्चेत होते.अभिनेत्रीच्या कामाबद्दल बोलताना, आयशा अलीकडेच सेलिब्रिटी मास्टरशेफमध्ये दिसली. ती ओटीटीवर काही सहाय्यक भूमिका देखील करते. अभिनेत्रीने २००३ मध्ये बांधकाम उद्योगपती समीर वाशीशी लग्न केले. पण दोघांनाही मुले नाहीत. अभिनेत्रीने याबद्दलही सांगितले की तिला कोणतेही मूल नको होते आणि तिने हा निर्णय तिच्या पतीच्या परस्पर संमतीने घेतला आहे.

# भारताचा अनोखा विक्रम, मेक इन इंडियाला बळकटी; ॲपलच्या मास्टरप्लॅननं चीनचे धाबे दणाणले

**नवी दिल्ली :** भारताने एका क्षेत्रात मोठी भरारी घेतली आहे. स्मार्टफोन निर्यातीत चीनला मागे टाकत अमेरिकेला सर्वाधिक स्मार्टफोन निर्यात करणारा देश बनला आहे. एप्रिल ते जून २०२५ या तिमाहीत अमेरिकेला पाठवलेल्या एकूण स्मार्टफोनपैकी ४४% स्मार्टफोन भारताने पुरवले होते, तर चीनचा वाटा केवळ २५ % राहिला. ॲपल सारख्या मोठ्या कंपनीने भारतात आयफोनचे उत्पादन वाढवल्यामुळे हे शक्य झाले आहे. ज्ञ्मेक इन इंडियाफ उपक्रमाला यामुळे मोठी बळकटी मिळत आहे. मनीकंट्रोलच्या अहवालानुसार, एप्रिल ते जून २०२५ या तिमाहीत हे महत्त्वपूर्ण बदल झाले. गेल्या वर्षी याच तिमाहीत चीन ६१% स्मार्टफोन अमेरिकेला निर्यात करत होता, तर भारताचा वाटा केवळ १३ % होता. ॲपलने चीनवरील अवलंबित्व कमी करून भारतात उत्पादन वाढवण्यास भर दिला आहे. आज, आयफोनचे बेस मॉडेल भारतात बनवले जात आहेत आणि ते अमेरिकेला पाठवले जात आहेत. मात्र, महागडे प्रो मॉडेल अजून तरी चीनमध्ये निर्माण करत आहेत. ॲपल व्यतिरिक्त, सॅमसंग आणि मोटोरोला यांसारखे इतर प्रसिद्ध ब्रँड्स देखील भारतातून फोन निर्यात करत आहे, परंतु यात ॲपल



आघाडीवर आहे.भारतात आयफोन बनवण्यासाठी आणि यांसारख्या कंपन्या एकत्र काम करत आहेत. एका अहवालानुसार, मार्च ते मे २०२५ दरम्यान ने भारतातून सुमारे ३.२ अब्ज डॉलरचे आयफोन अमेरिकेला पाठवले, ज्यापैकी ९७% फोन अमेरिकेसाठीच होते. अमेरिका आणि चीनमधील व्यापार तणावामुळे आणि कर वाढण्याची शक्यता असल्याने ॲपलने भारताला एक पर्यायी उत्पादन केंद्र बनवले आहे.या बदलामुळे भारताला मोठा फायदा झाला आहे. देश आता केवळ आपल्या लोकांसाठीच नव्हे, तर परदेशातही, विशेषतः अमेरिकेला स्मार्टफोन पुरवत आहे. यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत, देशाच्या उत्पन्नात वाढ होत आहे आणि ज्ञ्मेक इन इंडियाफ्लाही बळकटी मिळत आहे. तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांमध्ये आयफोन बनवण्याचे कारखाने सुरू झाले आहेत. तज्ञांचे मत आहे की, २०२५ मध्ये जगात जेवढे आयफोन बनतील, त्यापैकी २५ ते ३० % भारतात बनू शकतात.

# करिष्मा कपूरने नवरा संजय कपूरच्या ३० हजार कोटींच्या संपत्तीवर सोडलं पाणी, पण मुलांसाठी हक्क...

**मुंबई-** बॉलिवूड अभिनेत्री करिश्मा कपूरचा हिच्या एक्स नवऱ्याचे काही काळापूर्वी निधन झाले. संजय कपूर यांच्या मृत्यूला आता साधारण दीड महिन्यांचा कालावधी लोटला आहे. १२ जून २०२५ रोजी त्यांचे घशात मधमाशी जाऊन निधन झाले. आता त्यांच्या मालमत्तेबद्दल आणि वारसाहक्काबद्दलच्या अनेक गोष्टी चर्चेत आल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी अभिनेत्री करिश्मा कपूरने आपल्या एक्स नवरा संजयच्या मालमत्तेत तिचा वाटा मागत असल्याचा दावा केला जात आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच संजयची आई राणी कपूर यांनी आपल्या मुलाच्या मृत्यूच्या परिस्थितीवर शंका व्यक्त केली होती. तथापि, कुटुंबातील सूत्रांनी आता या वृत्तांचे स्पष्टपणे खंडन केले आहे.पिंकव्हिलाच्या वृत्तानुसार, संजय कपूरच्या कुटुंबाच्या जवळच्या सूत्रांनी खुलासा केला आहे की करिश्मा कपूरचा त्याच्या मृत्यूनंतर कोणत्याही वारसा किंवा मालमत्तेशी संबंधित प्रकरणांमध्ये काहीच सहभाग नाही. या केवळ निराधार अफवा आहेतसूत्राने सांगितले की, अभिनेत्री करिश्मा कपूर कोणत्याही प्रकारे वारसा किंवा मालमत्तेशी संबंधित बाबींमध्ये सहभागी नाही. त्यांची मुले हे खरे वारसदार आहेत आणि त्यांना त्यांचे हक्क मिळतीलच. करिश्मा सध्या फक्त तिच्या मुलांच्या कल्याणावर आणि त्यांच्या उज्वल भविष्यावर लक्ष केंद्रित करत आहे.यापूर्वी, संजय कपूरची आई राणी कपूर यांनी काही धक्कादायक दावे केल्याचे बोलले जात होते. त्यांनी सांगितले की त्यांच्या मुलाच्या शोकसभेत कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणण्यात आला होता.अभिनेत्री करिश्मा कपूरने २००३ मध्ये अभिषेक बच्चनसोबतचा साखरपुडा मोडून दिल्ली स्थित बिझनेसमन संजय कपूरशी लग्न केले. त्यांना कियान आणि समायरा ही दोन मुले आहेत. २०१६ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. करिश्माने संजयवर मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचे गंभीर आरोप



लावले होते. करिश्मासोबत लग्न मोडल्यावर संजयने प्रिया सचदेवशी लग्न केले. प्रिया ही सुद्धा एक विवाहित होती. तिला मुलगी होती पण तिचा घटस्फोट झालेला. त्यानंतर तिने संजयशी लग्न केले. संजय व प्रियाला देखील एक लहान मुलगा आहे. विशेष म्हणजे तिचे कियान आणि समायरा या करिश्माच्या मुलांसोबतही उत्तम जुळते.

# शासना कडून पगार घेणारे शिक्षकांचे शिकवणी क्लासेस बंद करा अन्यथा निलंबीत करा - सुरज यादव

**जनसंचलन/ खामगांव**

अ. भा. ग्रा. पत्रकार संघ द्वारा आरोग्य समिती विदर्भ आरोग्य प्रमुख सुरज यादव यांनी दिनांक ३० जुलै २०२५ रोजी दुपारी ३ वाजता अश्या आश्याचे निवेदन गट शिक्षण अधिकारी यांच्या मार्फत शिक्षण अधिकारी माध्यमिक शिक्षण केंद्र बुलढाणा यांना पत्राद्वारे सादर करून निदर्शनास आणून दिलेले आहे की मागील काही आठवड्या पूर्वी वसाडी, नांदुरा तालुक्यातील दहावीच्या एका विद्यार्थ्याने शाळेतील शिक्षकाच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केलेली आहे. हे खूप गंभीर बाब आहे. या प्रकरणाचे मागचे मुळ कारण काय हे पोलीस तपासात समोर येऊ शकते पण अशी परिस्थिती कोणत्याही दुसऱ्या विद्यार्थ्यावर येऊ नये म्हणून सर्व शाळेतील शिक्षकांना सर्व विद्यार्थ्यांशी सौजन्याने वागण्याची आणि योग्य वागणूक देण्याची विनंती करावी. काही शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या शिकवणी वर्गात ( ) मध्ये सामील होण्यासाठी त्रास देतात. अश्या प्रकारची काही तक्रारी आम्हाला मिळाल्या आहेत. शासनासकडून पगार मिळवणारे शिक्षक शिकवणी वर्ग चालवत आहेत हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. शासन मान्यता प्राप्त शाळांमधील काही कर्मचारी असलेले काही शिक्षक / शिक्षिका त्यांच्या पत्नी / पतीच्या नावाने शिकवणी वर्ग चालवत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. स्वयंअर्थसहाय्य शाळांमधील काही शिक्षक विद्यार्थ्यांना सतत त्रास देत आहेत आणि त्यांना त्यांच्या शिकवणी वर्गात सामील होण्यास भाग पाडत आहेत. जर कोणताही विद्यार्थी त्यांच्या शिकवणी वर्गात सामील झाला नाही तर ते त्यांना आंतरिक गुण देणार नाही याचा धाक दाखवून आणि अपशब्द बोलून अपमानित करून त्यांना शारीरिक आणि मानसिक त्रास देतात हे देखील आमच्या निदर्शनास आले आहे. हे अत्यंत गंभीर बाब आहे. शासनाकडून - शाळा व्यवस्थापनाकडून चांगली पगार मिळत असल्यावरही बेकायदेशीर शिकवणी वर्ग चालवून सदर लोक शासनाची आणि व्यवस्थापनाची फसवणूक करत आहे आणि पालकांचा आर्थिक शोषण ही करत आहे. म्हणून आपणांस विनंती की शिकवणी वर्ग चालवणाऱ्या शाळेतील शिक्षकांवर कठोर कारवाई करा, त्यांचे शिकवणी वर्ग पूर्णपणे बंद करावे अन्यथा त्यांना त्यांच्या सेवेतून निलंबित करावे जेणेकरून हजारों विद्यार्थ्यांना होणाऱ्या मानसिक व शारीरिक त्रासापासून वाचवता येईल. कृपया या पत्राची गंभीर दखल घ्यावी आणि आवश्यक ती कारवाई करावी अन्यथा बुलढाणा येथील जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांसमोर लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल ज्याची सर्वस्व जबाबदारी शासनाची राहील. असा ईशारा सुद्धा या निवेदनाद्वारा देण्यात आलेला आहे या निवेदनावर सुरज यादव , राजु घाटे , रुपेश कलंत्री , सिद्धेश्वर निर्मळ , प्रदीप शमी , सुमित शर्मा आदि पत्रकार लोकांच्या स्वाक्षऱ्या आहे अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे रुपेश कलंत्री यांनी दिली




# ११वीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रश्न गंभीर!

## देऊळघाटमध्ये अतिरिक्त तुकडी सुरू करण्याची मागणी

## अन्यथा १४ ऑगस्टला अन्नत्याग आंदोलन..



**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील देऊळघाट येथील जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (उर्दू माध्यम) येथे इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी केवळ एकच तुकडी उपलब्ध असल्याने, अतिरिक्त तुकडी सुरू करण्याची जोरदार मागणी होत आहे. यासंदर्भात पत्रकार सैय्यद इरफान सैय्यद अख्तर यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे आणि एका वर्गासाठी ६० विद्यार्थ्यांची मर्यादा निश्चित असल्याने अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकलेला नाही. देऊळघाट परिसरातील विद्यार्थी संख्येचा विचार करता, एकाच तुकडीमुळे अनेक हुशार आणि इच्छुक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. अर्थिकदृष्ट्या दुर्बल पालक आपल्या मुला-मुलींचे शिक्षण देण्यासाठी मेहनत करत आहेत. मात्र अतिरिक्त तुकडी उपलब्ध न झाल्यास त्यांना मुलांना बाहेरगावी पाठवावे लागेल, ज्याचा खर्च परवडणारा नाही. परिणामी अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. गावातील नागरिक, पालक व विद्यार्थ्यांनी यापूर्वीही याबाबत प्रशासनाकडे निवेदने दिली असली तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे आता हा प्रश्न गंभीर होत चालला आहे. जर तात्काळ योग्य निर्णय घेण्यात आला नाही, तर येत्या १४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर विद्यार्थ्यांसह पालकांचे अन्नत्याग आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासन जबाबदार राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.


# सांगा साहेब..शाळेत जायचे कसे?

## लोणार -अंजनी खुर्द रस्त्याची दुरवस्था!

**जनसंचलन/मेहकर**



कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही मेहकर मतदारसंघात विकासाचे घोडे अडलेलेच असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्याचाच एक भाग लोणार -अंजनी खुर्द रस्त्यची दुरावस्था आहे. सांगा साहेब..शाळेत जायचे कसे? असा प्रश्न विद्यार्थी आता विचारत आहे. सदर रस्त्यावर पिंपळखुटा (मापरी), कोयाळी (दहातोंडे),उदनापूर, वाल्हूर ही गावे आहेत. अंजनीखुर्द, कारेगाव या गावांना लोणारला जाण्यासाठी हाच मार्ग आहे. शहराच्या ठिकाणी शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या मुलांना याच रस्त्यावरून ये-जा करावी लागते. लोणार ते अंजनी खुर्द रस्त्याला मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता हे कळायला मार्गच उरला नाही. पावसामुळे खड्ड्यांत पाणी साचल्यामुळे वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.तर शाळा - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कमालीची कसरत करावी लागत आहे.मेहकर मतदार संघात करोडो रुपयांचा निधी खेचून आणला अशा वल्गना केल्या गेल्या. मग हा निधी कुठे खर्च झाला हा प्रश्न जनमानसांत निर्माण झाला आहे. तरी या संदर्भात लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देणे गरजेचे झाले आहे.



# प्यास अभी बाकी है!....

जनसंचलन/बुलढाणा

तहान जशी मानव- प्राण्यांना लागते तशी ती जलसाठे आणि शेती- निसर्गाला सुद्धा लागत असते. बुलढाणा जिल्ह्यात मात्र पावसाळा असून देखील काही गावे शेतीमाती व जलप्रकल्प व्याकूळ झाल्याच्या विदारक स्थितीत आहेत. जिल्ह्यातील तीन मोठ्या जल प्रकल्पात संकल्पित २२२.६९ दलघमी जलसाठ्यापैकी आतापर्यंत १२०.७३५ दलघमी एवढा म्हणजे ५४.२२ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. पावसाची प्रतिक्षा असली तरी लहरी पावसाचा लपंडाव सुरू असल्याने काहीशी चिंता व्यक्त होत आहे.पाण्याअभावी शेवटच्या घटका मोजत असलेले प्रकल्प, दिवसागणिक खोल जात असलेले भूगर्भातील पाणी, तळाला लागलेल्या विहिरी व बंद पडलेल्या बोअरवेल अशी जिल्ह्यातील विदारक परिस्थिती दरवर्षीचीच आहे. यंदाही पावसाळा सुरू असून देखील जलप्रकल्प तहानलेलेच दिसताहेत. जिल्ह्यातील अनेक गावात आजही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरू असून तेथे जिल्हा प्रशासनाने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला.काही गावात तर कोसो दूरवरून महिला डोक्यावर हंडे घेऊन जात असल्याचे दृश्य आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांनी महागडे



बियाणे पेरले आता पीके तरारली असून, शेकडो शेतकऱ्यांना पावसा अभावी दुबार पेरणी करावी लागली आहे.पावसाच्या लहरीपणामुळे बहरलेली पिके वाचवण्यासाठी अनेकांची धडपड सुरू आहे.अशात जलप्रकल्प तहानलेलेच दिसून येतात. जिल्ह्यात ३ मोठे प्रकल्प आहेत. मात्र या प्रकल्पात संकल्पित २२२.६९ दलघमी साठ्यापैकी आतापर्यंत १२०.७३५ दलघमी एवढा म्हणजे ५४.२२ टक्के जलसाठा उपलब्ध झाला आहे.नळगंगा प्रकल्पात संकल्पित ६९.३२ दलघमी जलसाठ्यापैकी ३२.७० इतका जलसाठा असून, याची ४६.२६ टक्केवारी आहे.खडकपूर्णा प्रकल्पात ९३.३२ एवढा संकल्पित साठा असून आज रोजी ४६.४९१ इतका पाणीसाठा असून ४९.७८ अशी टक्केवारी आहेतर पेनटाकळी प्रकल्पात संकल्पित साठा ५९.९७ असून आजचा जलसाठा ४२.१७४ ऐवढा आहे,याची टक्केवारी ७०.३३ आहे.एकंदरीत तीनही प्रकल्पात ५४.२२ ऐवढा जलसाठा उपलब्ध आहे.ऑगस्टच्या उंबरठ्यावर पाऊस पडत नसल्याने प्यास अभी बाकी है! याचा प्रत्यय येथे सर्वांनाच येत आहे.जिल्ह्यातील सात मध्यम प्रकल्पात एकुण १४१ दलघमी संकल्पित साठ्यापैकी १०४.७६८ एवढा जलसाठा उपलब्ध असून याची टक्केवारी ७३.९४ एवढी आहे. यापैकी कोराडी प्रकल्प १०० टक्के भरला आहे. तर ज्ञानगंगा ७६ टक्के आणि मस प्रकल्प ६९ टक्के भरले आहे.शिवाय एकुण ४१ लघु प्रकल्पात संकल्पित १०३.६१ दलघमी जलसाठ्यापैकी आज रोजी ५६.१ असा जलसाठा उपलब्ध असून याची ५४.५ अशी टक्केवारी असल्याची ३० जुलै पर्यंतची नोंद झाली आहे

# शेतात फवारणी करताय.. सावधान!

जनसंचलन/बुलढाणा

तणनाशक फवारणी करतांना शेतकऱ्यांनी दक्षता बाळगण्याची गरज निर्माण झाली असून, काही शेतकरी व शेत मजूरांना विषारी किटक व सर्पदंश होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. संतोष मेढे यांना फवारणी करतांना काल विषारी किडा डसल्याने त्यांना दोन ते तीन रुग्णालयात उपचार घ्यावा लागला असून त्यांची प्रकृती आता ठिक आहे. जिल्ह्यात आता शेतातील पिकांवर फवारणीसाठी लागबग सुरू झाली आहे. वातावरण बदलाचा पिकांवर विपरीत परिणाम होत असल्याने कीडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे आता कृषी विभागकडून फवारणी डब्ब्यासंदर्भात जनजागृती अभियान राबविणे गरजेचे आहे. कीड नियंत्रणासाठी शेतकऱ्यांकडून विविध कीटकनाशकांची फवारणी करण्यावर भर दिला जात आहे. मात्र, फवारणी करताना शेतकरी, मजुरांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कीटकनाशकांचा अतिविषारी, विषारी, बिनविषारी या तीन प्रकारात समावेश होतो. यातील लाल स्टिकर असलेला डब्बा विषारी असून, फवारणी करताना शेतकऱ्यांनी काळजीपूर्वक वापरणे गरजेचे आहे. तसेच शेतात काम करताना काळजी घेणे आवश्यक आहे. संतोष मेढे यांना शेतात तणनाशक फवारणीसाठी गेले असता काल जहरी किडा डसला होता. प्रथम त्यांना मोताळा येथे डॉ. रविंद्र महाजन यांनी दोन वेळा उपचार करूनही फरक न पडल्यामुळे त्यांना बुलढाणा येथे डॉ. राहुल मेहेत्रे यांच्या हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले पण पायावर सूज जास्त झाल्यामुळे त्यांना डॉ. भागवत भुसारी यांच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले व तेथे उपचार चालू आहेत. त्यामुळे शेतात औषध फवारणी करतांना साप व किड्यांपासून संरक्षण करण्यासाठी सजग पावले उचलण्याची गरज आहे. पावसाचे पाणी जमिनीत घुसून शेतशिवारात सरपटणाऱ्या या प्राण्यांची बिळे बंद होत आहेत. बिळे बंद झाल्यामुळे साप हे धुरे-बांधावरील गवतात, शेतातील पिकात लपत असतात. सोयाबीनच्या पिकांमध्ये सापांचा वावर जास्त वाढलेला आढळतो. यामुळे पिकात खुरपणी, फवारणी करताना शेतकरी, शेतमजुरांनी काळजी घेणे आवश्यक आहे. नजर चुकीने सापावर पाय पडला, हात लागल्यावर सापाने दंशानंतर तत्काळ उपचार घेणे गरजेचे आहे. पिकात खाली वाकू नये, साप दिसताच त्याला न डिवचता सर्पमित्राला संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# २० वर्षाचा सश्रम कारावास अन् ४० हजारांचा दंड!

## काय केले असेल आरोपीने?

जनसंचलन/ खामगाव

अलीकडे वासनांधता वाढत असून महिला सुरक्षिततेचा मुद्दा एरणीवर आला आहे.दरम्यान महिला अत्याचार प्रकरणी न्यायालयांच्या निकालांचेही स्वागत होत आहे. एका अल्पवयीन मुलीवर लैंगीक अत्याचार केल्या प्रकरणी आरोपीला खामगाव जलद गती न्यायालयाचे न्यायाधीश बिडवई यांनी २० वर्षाची सक्तमजूरी व ४० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास अतिरिक्त १ वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा देखील ठोठावली आहे. कैलास गोपाल निमकर्डे खामगाव असे या नराधमाचे नाव आहे. शहरातील एका भागात ही घटना सन २०२३ मध्ये समोर आली होती. पिडीत अल्पवयीन ११ वर्षीय मुलगी शौचास जात असतांना नराधम कैलास गोपाल निमकर्डे वय ५२ याने तिला त्याच्या घरी बोलावून लैंगिक अत्याचार केला. या घटनेची हकीकत मुलीने आईला सांगितली व मुलीच्या आईने पोलिसात तक्रार दिल्यावरून आरोपी विरुद्ध पोक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.तपास पूर्ण झाल्यावर प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात आले. साक्षी व पुराव्याच्या आधारे सरकारी पक्षाने केलेल्या युक्तिवादामुळे आरोपी दोषी म्हणून सिद्ध झाला. दरम्यान न्यायालयाने नराधाम कैलास गोपाल निमकर्डे याला कलम ४,६,८ अंतर्गत २० वर्षाची सक्त मजूरीची व प्रत्येकी १० हजार रुपये दंड कलम ३४२



अंतर्गत ६ महिन्यांची सक्तमजूरी व ५ हजाराचा दंड अशा एकुण ४० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. यातील २५ हजार रुपये पिडीतेला देण्यात यावे असेही आदेशात नमूद केले आहे. या प्रकरणी सरकारी पक्षा तर्फे अॅड. सुनील इंगळे तर फिर्यादीच्या बाजूने अॅड.गणेश इंगळे व अॅड. निलेश इंगळे यांनी युक्तिवाद केला.

# कधी मीठ नसते कधी तेल नसते?चिमुकली म्हणाली..

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाण्यातील चिमुकलीने आमदार रोहित पवारांसमोर समस्या मांडल्या व शेतकरी बापाच्या व्यथा सांगितल्या आणि त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.दरम्यान चिमुकली म्हणाली..कधी मीठ नसते कधी तेल नसते? केवळ मीठ चोळले जाते..या संदर्भात त्यांच्या वेदनेवर रोहित पवारांनी फुंकर घातली आहे.मी शेतकऱ्याची मुलगी आहे, शेतकऱ्याच्या घरात कधी मीठ असते तर तेल नसते,अशी ओरड होत आहे. बुलढाण्याच्या चिखली तालुक्यातील भरोसा या गावातील शेतकरी दांपत्याने गळफास लावून एकच दिवशी आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना सांत्वनपर भेट देण्यासाठी आलेल्या आमदार रोहित पवार यांची काही विद्यार्थ्यांनी भेट घेतली, दरम्यान आठव्या वर्गात



शिकणाऱ्या सीमा गजानन थुट्टे या चिमुकलीने आपल्या शेतकरी बापाची व्यथा मांडत शेतकऱ्यांच्या समस्यांचा आमदार रोहित पवार यांच्या पुढे पाढाच वाचला.. शेतकऱ्यांच्या घरात कधी मीठ असते तर तेल नसते, तेल असते तर मीठ नसते? सरकारला शेतकऱ्यांचा जीव गेल्यावर जाग येणार का.. असा सवाल देखील या चिमुकलीने यावेळी उपस्थित केला, त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होतोय.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८